IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातकरी समाज आणी समस्या [१९४७ नंतर]

प्रा.श्रीकांत विक्रांत सिरसाठे

इतिहास विभाग प्रमुख

श्री.स.ह.केळकर महाविद्यालय देवगड जि.सिंधुदुर्ग

**गोषवारा :**

एकविसाव्या शतकातही आदिवासी समाज हा डोंगर दऱ्यांमध्ये आपले वास्तव्य करून आहे त्यांच्या रूढी, प्रथा, परंपरा जोपासण्याचे काम हा समाज आजही करीत असताना दिसून येतो. 21 वे शतक हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते सर्वांना त्याचा लाभ होतो असे म्हणतो परंतु आदिवासी समाज आजही विज्ञान-तंत्रज्ञान पासून दूर आहे विकासाचा लवलेशही यांना माहित नाही आजही यांचे जीवन खडतर आहे, भौतिक सुविधा पासून आदिवासी समाज वंचित असल्याचे दिसून येते या जमातीच्या रूढी प्रथा परंपरा त्यांचे जीवन त्यांच्या समस्या यावर प्रकाश पडला पाहिजे या उद्देशातून प्रस्तुत शोध निबंधामध्ये काही उद्दिष्ट निश्चित केले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 1950 च्या सुरुवातीपासून, कातकरी कुटुंबे डोंगरावरील वडिलोपार्जित भागातून मैदानावरील कृषी गावांच्या बाहेरील भागात कायमचे स्थलांतर करू लागले आजचे कातकरी हा एक विखुरलेला समुदाय आहे, जो त्यांच्या उपजीविकेसाठी आणि राहण्यासाठी इतरांवर खूप अवलंबून आहे. बहुतेक कातकरी हे भूमिहीन कामगार आहेत २१ व्या शतकातही जुन्या चालीरीती, श्रद्धा, रुढी आणि जीवनशैली जपली आहे. शिकार करणे, जंगलातील लाकडे विकणे, मध विकणे इत्यादी समाजाचे जगण्याचे स्त्रोत आहेत. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील इतर विकसित समाजाच्या तुलनेत आदिवासी समाज मागासलेला आहे.

**मुख्यशब्द :** कातकरी, आदीवासी, जमात, डोंगरदऱ्यात, भूमिहीन, जीवनशैली, मागासलेला

**प्रस्तावना:**

आदिवासी समाजात अनेक जमाती आहेत. मात्र, त्यातला कातकरी समाज आदिम आहे. मागासलेपणा मोठ्या प्रमाणात आहे कुठं काथोडी, तर कुठं कातोडी म्हणून ओळखला जाणारा कातकरी परिस्थितीनं मात्र सगळीकडे सारखाच.भारतीय समाजरचना आणि गरीब श्रीमंतीची दरी कातकरी पाड्यावर गेल्यावरच प्रत्यक्ष अनुभवता येते. रानावनात भटकणारा, आकाश हेच पांघरूण आणि जमीन हेच ज्याचे अंथरूण आहे, अशा कातकरी समाजाला आजही राजाश्रय नाही. समाज तर त्याला आपला घटकच मानत नाही. 1950 च्या सुरुवातीपासून, कातकरी कुटुंबे डोंगरावरील वडिलोपार्जित भागातून मैदानावरील कृषी गावांच्या बाहेरील भागात कायमचे स्थलांतर करू लागले आजचे कातकरी हा एक विखुरलेला समुदाय आहे, जो त्यांच्या उपजीविकेसाठी आणि राहण्यासाठी इतरांवर खूप अवलंबून आहे. बहुतेक कातकरी हे भूमिहीन कामगार आहेत २१ व्या शतकातही जुन्या चालीरीती, श्रद्धा, रुढी आणि जीवनशैली जपली आहे. शिकार करणे, जंगलातील लाकडे विकणे, मध विकणे इत्यादी समाजाचे जगण्याचे स्त्रोत आहेत. त्यामुळे इतर विकसित समाजाच्या तुलनेत आदिवासी समाज मागासलेला आहे. समाजाला अत्यंत निरक्षरता, अंधश्रद्धा, दारिद्र्य अमली पदार्थांचे व्यसन या गोष्टींचा सामना करावा लागत असल्याचे दिसून येते. त्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, आरोग्यविषयक प्रश्न सोडविल्याशिवाय समाजाचा विकास योग्य पद्धतीने होऊ शकत नाही.

**संशोधनाची उद्दीष्ट:**

१. कातकरी जमातीच्या सामाजिक आणी आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. क ातकरी जमातीच्या समस्यांबाबत अभ्यास करने.
३. क ातकरी जमातीचे मूळ आणि जिल्ह्यातील कातकरी जमातीच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक पैलूंचा अभ्यास करणे.
४. क ातकरी जमात अत्यंत दरिद्री आणि अंमली पदार्थांच्या व्यसनाने ग्रस्त आहे.

**सि ंधुदुर्ग जिल्ह्यातील वसतीस्थान:**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातकरी समाज हा आदिवासी जमातीतील एक आहे. जिल्ह्यात देवगड, कुडाळ, मालवण, कणकवली, वेंगुर्ले या तालुक्यात विखरुन हा समाज गेली कित्येक वर्ष राहत आहे. वानरमारे अशी यांची जिल्ह्यातील ओळख. देवगड कुडाळ, मालवण, कणकवली, वेंगुर्ले तालुक्यातील जंगलात आणी नदीकाठावर यांची वसतीस्थान आहेत. या पाच तालुक्यातील कातकरीं लोकसंख्या ही १४५० च्या आसपास आहे.

**कातकरी समाजाच्या समस्या :**

१. **व्यसनाधीनता** :

आदिवासीमध्ये दारूचा वापर धार्मिक व सामाजिक विधींनी जोडलेला आहे. पिणारे जमातीत आहेत पण सर्व जमातच दारू पिणारी असणे याहून वेगळे आहे. त्यामुळे आदिवासींमधील कोणतीही व्यक्ती या व्यसनापासून मुक्त नाही एका व्यक्तीला व्यकसनमुकत करणे शक्य आहे पण सर्व जमातीला व्यसनमुक्त कोण करणार? थोडक्यात आदिवासी व्यक्तीला व्यसनमुक्त होण्याचे सांस्कृतिक व सामाजिक स्वातंत्र्य असू शकत नाही दारू पिणे हे समाजस्वास्थला हानीकारक कारक आहे ही बाब मान्य कदत नाही. (1) शेतावर मजुरीचे काम करायचे. मिळेल ते खायचे, मिळालेला पैसा दारूतच संपवायचा हा त्यांचा दिनक्रम. बहुतांश वस्त्यांवर प्रत्येक झोपडीत हातभट्टीची दारू नजरेस पडते. पुरुषांबरोबर महिला आणि लहान मुलेही पाणी प्यावे तितक्या सहजतेने दारू पितात. चार बाजूने कुडाची भिंत असलेल्या या घरात फक्त दारूचीच दुर्गंधी जाणवते.अपुरे अन्न, आणि सतत दारूच्या आहारी गेलेल्या या कातकरींचे आयुष्य जास्तीत जास्त ४० ते ४५ वर्षे असल्यामुळे अनेक कातकरी पाडे नष्ट झाले असून अनेक पाड्यांवर केवळ महिला आणि लहान मुलेच नजरेस पडतात.

२. **शैक्षणिक समस्या :**

आदिवासी समाज हा नागरी समाजापासून दूर अतिदुर्गम भागात वास्तव्याला असल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व त्याला पटले नाही आणि ज्या हिंदू , ख्रिश्चन समाज सेवी चळवळी त्यांच्या पर्यंत पोहोचल्या पण त्यांचा धर्मांतराचा छुपा अजेंडा पाहून आदिवासी त्यांच्या शाळा पासून दूर राहिला. शासनाने काही शाळा सुरू केल्या मात्र त्या अनेक पाडयासाठी एक आणि मुलांना जंगलातून, नदी नाल्यातून संकटांना तोंड द्यावे लागते त्यामुळे ते घरीच बसणे पसंत करतात. बऱ्याच आदिवासी जमातीत शाळेबाबत अनास्था आहे ज्याने चोच दिली तो चाराही देखील देईल अशा प्रवृत्तीमुळे मुले पारंपरिक मासेमारी, जंगलीशिकार, फळे, कंदमुळे गोळा करणे पसंत करतात. आदिवासी समाजामध्ये रोजच भाकरीचे समस्या भेडसावते त्यामुळे शाळा शिकून भाकर मिळत नाही ही भावना त्यांची असते त्यामुळे ते शिक्षणापासून दूर राहतात. याचबरोबर शाळा -वस्तीग्रह ,वीज, ग्रंथालय, रात्रशाळा, खडू-फळा अभियान संगणकावरील तंत्रज्ञान शिक्षण व विकासासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा अभाव किंवा प्रभावी अंमलबजावणी चा अभाव यामुळे आदिवासी शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसून येते.

३. **म ुलभूत सुविधांपासून वंचित:**

आर्थिक विवंचनेने ग्रासलेल्या गावाबाहेर असलेल्या या पाड्यांना मुलभूत सुविधाही मिळत नाहीत. वस्तीवर पिण्यासाठी पाणी आहे ते बोअरवेलचे क्षारयुक्त पाणी. यातही अनेक बोअरवेलना पाणीच नसल्यामुळे शेकडो मैलावरून या महिला डोक्यावरून पिण्यासाठी पाणी आणतात.

४. **अ ंधश्रद्ध ा** :

अंधश्रद्धेचे समूळ उच्चाटन करण्याचा शासनाने कितीही संकल्प केला तरी या समाजाचा विश्वास आहे तो भगतावरच. आजही कोणी आजारी पडल्यास त्या व्यक्तीला डॉक्टरकडे न नेता प्रथम मांत्रिक किंवा भगतचा शोध घेतला जातो. हवेत हातवारे करून उपचार करणारे भगत वस्त्यावस्त्यांवर दिसतात.

५. **श ासकीय योजने पासून वंचीत :**

आदिवासी विभागाच्या अनेक योजना आहेत. मात्र, त्या कागदपत्रांच्या विळख्यात अडकल्या असून खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत कधीच पोचत नाहीत. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता सर्वत्र विखुरलेल्या या समाजाची प्रत्यक्ष जनगणना झाली पाहिजे. त्यातील मुलांना शिक्षण दिले गेले पाहिजे, मुलींना सकस आहार, मातांनासुद्धा योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. कातकरी काम मिळेल तिथे, या गावातून त्या गावात भटकत असतात. यामुळे या समाजाची शासनाच्या दप्तरात नोंदच नाही. सरकारी बाबू सर्वेक्षण करण्यासाठी वस्तीत येतात तेंव्हा या वस्तीतील झोपड्या कायम रिकाम्या असतात. नोंदणी न झाल्यामुळे कसल्याही सरकारी योजनांचा लाभ देता येत नाही.

६. **निरक्षरता (अज्ञान) :**

कातकरी जमातीमध्ये आता कुठे पहिली पिढी शिक्षणाच्या प्रहावात येऊ पाहत आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेत आहेत. त्याचेही प्रमाण खूपच कमी आहे.स्थलांतरामुळे शिक्षण घेता येत नाही. शिक्षणाचे महत्व त्यांच्या पर्यंत पोहचले नाही. थोड्या फार प्रमाणात  शिक्षण त्याच्या पर्यंत पोहचले आहे. त्यांची इच्छा जरी असली तरी पुढील शिक्षणासाठी लागणारा अवाढव्य खर्च यामुळे ते उच्च शिक्षण घेऊ शकत नाहीत. सरकारच्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे यापुढे तर शिक्षण घेतील कि नाही, याचीही  हि शास्वती नाही.शिक्षणापासून कोसो दूर असलेल्या या समाजाला मुख्य प्रवाहात आणणे ही काळाची गरज आहे. देश बदलत असताना आणि महासत्ता होत असताना समाजाचे प्रत्येक अंग आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने विकसित झाले पाहिजे.

७. **आरोग्यविषयक समसया :**

या  सामाजिक महतवाचा  प्रश्न म्हणजे  .या समाजात आरोग्यविषयक नियमांविषयी आणी औषधोपचार याविषयी अनास्था  आढळून येते. अस्वच्छता , गढूळ पाणी पिलयामुळे रोगराई शी सामना करावा लागतो.आरोग्याच्या सुविधा तर त्यांच्या पर्यत कधीच पोहचल्याच नाहीत. सदृढ राहण्यासाठी पौष्टीक सकस आहाराची गरज असते हे देखील त्यांना माहित नाही. कारण या गोष्टी कधी त्यांच्या पर्यत पोहचल्याच नाही.रोज काम करून मिळेल तेच खायचे आणि जगायचं.हे त्याचं रोजचं आयुष्य. आजच आज आणि उद्याच उद्या या पद्धतीने जगणारा कातकरी समाज आहे. त्यामुळे लहान मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. महिलांना बाळंतपणात ही योग्य आहार मिळत नाही. कातकरी जमातीसाठी सरकारी  योजना आहेत. पण तरीही या  ठिकाणी  योजना पोहचल्या नाहीत.

८. **कर्जबाजाराची समस्या**

कातकरी  जमातीत लग्नकार्य करण्यासाठी कर्ज  काढून लग्न करतात. तयासाठी सावकाराकडून  व्याजाने  पैसे काढून खर्च केला जातो. लगनाचा बस्ता,बोलाचा खर्च, मानपान दारू खर्च या वर खर्च केला जातो. त्याचबरोबर ही कतकरी लोक आरोगयाचया समसया निर्माण झाल्यास ही वयाजाने पैसा काढून उपचार कररतात.

९. **क ुपोषण आणी बालमृत्यू:**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाचे प्रमाण जास्त आहे. या पावसात आदिवासी भागात कुपोषण आणी बालमृत्यू चे प्रमाण वाढते. या हंगामात आदिवासी भागातील आदिवासी जनतेसमोर आरोग्य आणि धान्याची समस्या उभी राहते.महिलांची पोषकस्थिती कमकुवत आहे.कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे  आणि कुपोषण आणी बालमृत्यू आदिवासी भागात कधीच चुकत नाही.  पूर्वीची साथीचे रोग येऊन लोक तडकाफडकी मरत असत . मृत्यूची एकामागून एक अशी अखंड मालिका दिसून येई  आहे या भावनेने अंगारे धोपारे करत त्यातून त्यांची अपरिमित हानी होई. पण केवळ देवावर विश्वास ठेवून लोक अनेक उध्वस्त झाली आहेत.  या समस्येचे मुळ आदिवासींच्या दारिद्रयात आणि उपासमारीत आहे.

१०. **र ोजगाराची समस्या :**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातकरी समाजातील रोजगाराच्या समस्या जाणून घेण्यासाठी देवगड, वेंगुर्ले,मालवण, कुडाळ येथील वसतीवर जावून सर्वेक्षण केले असता 100% टकके लोक मजूरी करणारे आढळून आले.माड साफ करणे, कलमाच्या बागेत काम करणे, वनऔषधी गोळा करून आठवडी बाजारात विकणे, लाकडाच्या मोळया विकून पैसे कमावून आणणे.कातकरी कुटुंबाकडे कोंबड्या सोडलया तर कोणतीच स्थावर  मालमत्ता आढळून येत नाही.या कुटुंबाचे वार्षिक सरासरी उत्पन्न दहा हजाराच्या आत असलयाचे आढळून आले.

**क ातकरी समाजाच्या समस्या वरील उपाय :**

कातकरी समाज हा आजही अतिशय दारिद्र्यात जीवन जगत असून तो अतिशय दुर्गम भागात विकासापासून दूर आहे. त्यामुळे आजच्या आधुनिकीकरणाच्या युगातही आदिवासी समाज सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, आरोग्य अशा कितीतरी समस्या मध्ये अडकला आहे. त्यांच्या समस्या सोडवून त्यांचा विकास झाल्याशिवाय त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणल्याशिवाय आपल्या भारताच्या महासत्तेचे स्वप्न पूर्ण होणार नाही. यासंदर्भात सर्व पातळीवर आदिवासी समाजाच्या समस्यावरील उपाय योजनांचा आढावा घेता येईल.

1. कातकरीच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्यांना राष्ट्रीय प्रवाहात आणले पाहिजे ही परिवर्तनाची विकासाची प्रक्रिया आहे म्हणून त्यांच्या परंपरागत संस्कृती व इतर असतील त्यांना धक्का न बसू देता हळूवारपणे त्यांच्या विकासाच्या प्रक्रियेत सामीलीकरण करावे यालाच ड ॉ. धुरये व ठक्कर बाप्पा यांनी ‘सामाजीकरण’ असे म्हटले. त्यांनी हा विचार मांडतांना आदिवासींना वेगळे ठेवणे म्हणजे राष्ट्रीय ऐक्याला धोका निर्माण करणे होय असे सांगितले यामुळे आदिवासींना इतरांप्रमाणेच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रातील हक्क अधिकार मिळतील व सभ्य समाज व आदिवासी यांच्यात एकतेची भावना निर्माण होऊन समानता प्रस्थापित होईल या सामाजिक विलीनीकरणातूनच विकास घडेल असा एक आदिवासी च्या समस्या वरील उपाय समोर आला आहे.
2. क ातकरी समाजाच्या समस्या सोडवून त्यांचा विकास करण्यासाठी दुसरा उपाय समोर आला तो एकात्मिक करण्याचा डॉ. हट्ट याने अलिप्ततावाद व सामीलीकरण या दोन्ही उपायाचा विरोध करून एकात्मिकरणाचा सुवर्णमध्य साधला डॉ. हट्ट पृथकरणाने तो विकासापासून दूर राहील व विकासाची दारिद्र्याची समस्या सुटणार नाही आणि सामिलीकारणाने परंपरागत आदिवासी संस्कृती नष्ट होईल म्हणून यासाठी एकात्मिकरणारा महत्त्व त्यांनी दिले त्यांनी राष्ट्रीय एकात्मता निर्माण करून त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याला प्राधान्य दिले. हे करताना त्यांच्यावर सभ्य संस्कृतीने बळजबरी करून लादू नये व सक्तीचे सामीलीकरण करू नये त्यांच्यात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करून विकास साधावा असा विचार मांडला.
3. क ातकरीच्या विकास योजना, त्यासाठी केलेले कायदे त्यांची कडक अंमलबजावणी सरकारमार्फत झाली पाहिजे. शासकीय अधिकारी, पोलीस, सावकार, जमीनदार यांच्यावर नियंत्रण ठेवून त्यांच्याकडून होणारे श ोषण थांबवले पाहिजे आणि अशा गुन्ह्यात सापडलेल्या कर्मचारी, जमीनदाराला तात्काळ शासन करून कायद्याचा धाक निर्माण करून शोषण थांबवले पाहिजे.
4. क ातकरी समाजाचा अतिदुर्गम भागात वास्तव्याला असतो यासाठी शासनाने पुढाकार घेऊन नागरी समाजाप्रमाणे त्यांना शुद्ध पाणी ,रस ्ता, वीज या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
5. क ातकरी समाजाच्या विकासासाठी नागरी समाजातील सुज्ञ सेवाभावी घटक, सामाजिक, राजकीय संघटनांनी त्यांना विश्वासात घेऊन त्यांचे प्रबोधन करावे, जनजागृती करावी हे करत असताना या घटकांनी धर्मांतराचा प्रयत्न करू नये त्यांच ी संस्कृती धर्म अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करावा.
6. क ातकरी समाजाचे दारिद्र्य निर्मूलन झाले पाहिजे त्यासाठी त्याला तो ज्या भागात राहतो तेथे रोजगार निर्माण करून दिला पाहिजे त्यांचे परंपरागत जल -जंगल -जमीन वरील अधिकार पुन्हा त्यांना मिळवून दिले पाहिजेत त्यामुळे ते जंगलातील वनोपजत वनस्पती औषधी अन्न खाऊन समाधानी राहतील.
7. क ातकरी समाजामध्ये कलात्मक जीवन जगण्याचा आविष्कार आहे, म्हणून त्यांची संस्कृती व कला जतन केली पाहिजे. या कलाच्या रक्षणासाठी शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करून त्यांचे संरक्षण केले पाहिजे.

8. कातकरी समाजाचे शारीरिक, मानसिक व लैंगिक शोषण थांबविण्यासाठी केवळ शासनाने नाही तर सामाजिक संघटनांनीही पुढाकार घेतला पाहिजे, शोषण करणारा जो जमीनदा, सावकार, प्रशासकीय अधिकारी आहे यांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
9. कातकरीच्या आरोग्याच्या बाबतीत प्रबोधन होणे गरजेचे आहे साथीचे आजार प्रसूतिपूर्व सेवा, प्रसूती काळ, कुटुंब कल्याण याबाबतीत त्यांच्यात जनजागृतीची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष**:

अजुनही बऱ्याचशा 'कातकरी कुटुंबांना पुर्णवेळ रोजगार मिळत नाही. म्हणजे आठवड्याने मजुरी मिळत असल्याने त्यांना रोजचा उदर निर्वाह करणे कठीण होते. रोजगार हमीची कामे लांब दुरवर असेल तर स्थानिक मजुरी 'कातकरी कुटुंबांना करावी लागते आणि मजुरी मिळाली नाही तर दिवसभर नदी नाल्यावर किंवा धरणांच्या काठावर जाऊन मासेमारी करावी लागते. अशा प्रकारे 'कातकरी' समाजाकडे शासनाने विशेष लक्ष देऊन त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करता येईल अशी परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे. आदिवासी कातकरी जमातीने संघटीत होणे आवश्यक आहे. कातकरी समाजाला त्यांचे शोषण, पिळवणूक,अन्याय होत आहे.याची जाणीव जोपर्यंत होणार नाही, तसेच शिक्षणाचे महत्व पटवून दिल्याशिवाय या समाजाचा विकास होऊ शकत नाही.रोजगार मिळाला,उपलब्ध करून दिला तर कातकरी जमातीचे स्थलांतर थांबेल.यामुळे अनेक प्रश्न हि सुटतील. असे वाटते. तसेच 'कातकरी कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ:**


1. डॉ. गोविंद गारे, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती 2000.
2. नाडगोंडे गुरुनाथ, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,1979.
3. कर्वे, इरावती , मराठी लोकांची संस्कृती , पुणे 1951
4. फडके सुधीर ,महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, पुणे 1963
5. Welling,N.A, The Katkaris,Bombay,1934.
6. Sherring,MA., Hindu Tries And Castes,Calcutta,1872.
7. डॉ गारे गोविंद, भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती, अमृत प्रकाशन, औरंगाबाद 1975
8. सौ. गवळण कलकत्ते, अग्नि कुंडातील आदिवासी स्त्रि, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, सप्टेंबर 2011
9. डॉ. माहेश्वरी गावित, आदिवासी जीवनअविष्कार, आनंद प्रकाशन, अहमदनगर, 2008.
10. डॉ. शौनक कुलकर्णी, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पब्लिकेशन, पुणे ऑक्टोबर 2009
11. डॉ. गणेश देवी, वानप्रस्थ, पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती 2007.
12. डॉ. गोविंद गारे, आदिवासीचे शिक्षण, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती 2009.
13. डॉ. सौ.शैलजा देवगावकर, महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जुलै 2007.
14. प्रभाकर मांडे, भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, 2003
15. डॉ. प्रदीप आगलावे, आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट 2004.